# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – १५ सप्टेंबर २०१५

## विद्यार्थ्यांनी अधिकाअधिक शिष्यवृत्तीचा फायदा घ्यावा- हेलेन पेनेंट

मुंबई- भारतीय तरुणांनी केंब्रिज विद्यापीठातील ५०० हून अधिक उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्तीचा अधिकाअधिक फायदा घ्यावा असे आवाहन केंब्रिज कॉमनवेल्थ युरोपिअन अँड इंटरनेशनल ट्रस्टच्या संचालक हेलेन पेनेंट यांनी केले.मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या " केंब्रिज विद्यापीठातील शिष्यवृत्ती संधी" याविषयावर त्या आज बोलत होत्या. सर फिरोजशहा मेहता सभागृह कालिना येथे आयोजित केलेल्या चर्चासचत्रात त्यांनी मुंबई विद्यापीठातील विविध विभागातील आणि सलंग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी याविषयी संवाद साधला.पुढे त्या म्हणाल्या की,केंब्रिज विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ तसेच भारतीय विद्यापीठांचे एक मैत्रीपूर्व संबंध आहेत.अनेक भारतीय शास्त्रज्ञ ,नामवंत हे केंब्रिज विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत.आजमितीला केंब्रिज विद्यापीठात २००हून अधिक भारतीय विद्यार्थी शिकत आहेत आणि हे भारतीय उपखंडाच्या दृष्टिकोनातून खूप महत्वपूर्ण आहे.केंब्रिज विद्यापीठात जवळपास १८ हजार परदेशी विद्यार्थी विविध शाखेतील शिक्षणक्रम घेत आहेत.तर अनेक भारतीय प्राध्यापक हे केंब्रिज विद्यापीठात शिकवत आहेत.

ग्लोबल नॉलेज इकोनॉमी मध्ये भारतीय विद्यार्थ्यांचा सहभाग आणि संशोधनाला चालना देण्यासाठी केंब्रिज ट्रस्टच्या माध्यमातून दरवर्षी ५०० हून अधिक शिष्यवृत्ती उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.इंटरडिसीप्लनरी विद्याशाखा,शैक्षणिक असे पुरक वातावरण या सर्व बाबींचा विद्यार्थ्यांनी अधिकाअधिक फायदा घ्यावा असेही त्या म्हणाल्या.तर केंब्रिज ट्रस्ट आणि केंब्रिज विद्यापीठामार्फत भारतीय तरुणांमधील संशोधनवृत्तीला चालना मिळण्यासाठी ही एक उत्तम संधी असून अधिकाअधिक

विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा असे आवाहन कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी केले. येत्या काळात मुंबई विद्यापीठाची ओळख ही रिसर्च युनिव्हर्सिटी म्हणून नावारुपाला येणार असल्याचा आशावाद त्यांनी व्यक्त केला.मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागातील प्राध्यापक डॉ.मंजिरी कामत यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला डॉ.शशिकुमार चित्रे यांचेही मार्गदर्शन लाभले.

## भारतीय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शिष्यवृत्ती

- केंब्रिज इंटरनेशनल स्कॉलरशिप
- केंब्रिज इंडिया रामानुजन स्कॉलरशिप
- जवाहरलाल नेहरु मेमोरिअर ट्रस्ट केंब्रिज स्कॉलरशिप
- राजीव गांधी फाऊंडेशन केंब्रिज स्कॉलरशिप
- प्रतिभा एम सिंग केंब्रिज स्कॉलरशिप
- कॉमनवेल्थ शेअर्ड केंब्रिज स्कॉलरशिप
- चेवेनींग /केंब्रिज स्कॉलरशिप
- पेमेन्डा मोनप्पा स्कॉलरशिप

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)